## अटी / शर्ती

१) प्रत्येक दुकान गाळ्यासाठी स्वतंत्र ई-निविदा भरणेची आहे.

२) शासनाच्या व्यवसायासाठीच गाळ्यांचा वापर करणेचा आहे.(मद्य,स्फोटक वस्तू विक्री शिवाय,व्हिडीओ गेम यासारखे व्यवसाय दुकान गाळ्यांमध्ये करता येणार नाहीत.) तसेच बोली बोलणारा सध्या ज्या ठिकाणी वास्तव्यास आहे तेथील रहिवाशी पुरावा म्हणून आधार कार्ड व सक्षम प्राधिकरणांकडील फोटो आयडी पुरावा देणे आवश्यक आहे. तसेच व्यवसाय सुरू करणेपूर्वी संबंधीत विभागाचा ना-हरकत दाखला व ट्रेड लायसन्स घेणे बंधनकारक राहील.

३) ई- निविदा पूर्वी दुकान गाळा प्रत्यक्ष पाहून खात्री करून सहभाग घेणेचा आहे. तो ज्या स्थितीत आहे तसाच भाडेतत्वावर देणेत येणार आहे.

४) ई- निविदेत सहभाग घेत असताना महानगरपालिकेची कोणतीही चालू महिन्याचे येणेबाकी नसल्यास ना-देय प्रमाणपत्र ई- निविदा बोली रक्कमेसोबत सादर करणे बंधनकारक आहे.

५) दुकान गाळा हे दहा (१०) वर्षासाठी ई-निविदेने भाडेपट्टयाने देणेतचे आहेत. भाडेपट्टयाच्या रकमेत दर तीन वर्षांनी सुधारणा करून वर्तमान वार्षिक भाडेपट्टयाची रक्कम पाच टक्क्यांनी वाढविली जाईल व त्या प्रमाणात सुरक्षा ठेव रकमेत देखील वाढ केली जाईल.

६) भाडेपट्टा कराराची स्वखर्चाने रीतसर नोंदणी करावी लागेल आणि भाडेपट्टयाच्या नूतनीकरणाच्या वेळी महानगरपालिकेला आवश्यक वाटेल अशा अतिरिक्त अटी व शर्तीचा करारामध्ये समाविष्ट करणेचा अधिकार मा.आयुक्त यांनी राखून ठेवलेला आहे.

७)भाडेपट्टा नूतनीकरणाच्या वेळी मूळ भाडेपट्टाधारकाने संबंधित महानगरपालिका मालमत्तेचे पूर्वीचे सर्व कर आणि मालमत्तेचे भाडे किंवा इतर कोणतीही देणी भरलेली असतील.

८) ज्यांच्या नांवे ई-निविदा अंतीमरित्या मंजूर होईल त्यांनी मंजूर समज मिळालेपासून १० दिवसात ई-निविदा बोलीची सुरक्षा ठेव व सहा महिन्याची भाडे रक्कम भरणा करून नोंदणीकृत भाडेपट्टा करार करून देणेचा आहे. याबाबतचा संपूर्ण खर्च भाडेकरूनेच करणेचा आहे.यानुसार पुर्तता न झाल्यास भरणा केलेली बयाणा / इसारा रक्कम जप्त करून गाळ्यांचा फेर ई-निविदा करण्यात येईल.तसेच १० दिवसात नोंदणीकृत भाडेकरारपत्र व सुरक्षा ठेव रक्कम भरणा केली नाही तर अशा व्यक्तींस / मक्तेदारांस ब्लॅकलिस्ट करणेत येईल व अशा व्यक्तींस / मक्तेदारांस इ.म.न.पा.च्या कोणत्याही ई-निविदा/ई लिलाव प्रक्रियेमध्ये सहभाग घेता येणार नाही.

९)ई-निविदा अंतीमरित्या मंजूर झालेनंतर सर्व अनामत रक्कम व सहा महिन्याची भाड्याची संपूर्ण रक्कम भाडेपट्टा करार करण्यापूर्वी आगाऊ भरणे बंधनकारक आहे.तद्नंतर महानगरपालिकेकडून गाळ्याचा ताबा देण्यात येईल.

१०)शासनाला तसेच महानगरपालिकेला देय असलेल्या रकमा भाडेपट्टाधारकाने करारात किंवा करारनाम्यामध्ये नमूद केलेल्या विहित मुदतीत अदा करावी.

**११)शासनाला तसेच महानगरपालिकेला देय रकमा भाडेपट्टाधारकाने विहित कालमर्यादेत अदा केली नाही तर महानगरपालिका अशा मालमत्तेचा ताबा घेईल आणि अशा सर्व देय रकमा सुरक्षा अनामत रक्कमेतून वसूल केल्या जातील.आणि अशा वसूलीनंतरही जर काही देय रकमा वसूल झाल्या नाहीत, सदर देय रकमा जमीन महसूलाची थकबाकी म्हणून वसूल केल्या जातील.**

**१२)मंजूर दुकान गाळा यासाठी भरणा केलेली** सुरक्षा ठेव रक्कम **ही महानगरपालिकेकडे बिनव्याजी राहील.त्यापोटी व्याज देय राहणार नाही.**

१३) सदर दुकान गाळाचा घरफाळा,पाणीबील,लाईट बील व सर्व प्रशासकीय/निमशासकीय लागू असणारे कर ,अकृषिक कर या शिवाय वेळोवेळी लागू होणारे इतर कर विहित वेळेत भरणा करणे बंधनकारक राहील.तसेच मंजूर गाळेधारकाचे मालकीच्या म.न.पा.क्षेत्रातील सर्व मालमत्ताचे मालमत्ता कर मुदतीत भरणे बंधनकारक राहील. उक्त करांचा अंतर्भाव गाळा भाडे/ सुरक्षा ठेव रक्कमेध्ये समाविष्ट असणार नाही.

१४)विद्यमान नियमानुसार निश्चित केलेले भाडेपट्टयाची रक्कम अदा केली नसल्यास हे नियम लागू झालेचे तारखेपासून भाडेपट्टा धारकांस प्रतिमहा 1 % दररोज दंड लागू राहील.प्रलंबित भाडेची रक्कम,दंडाची रक्कम आणि सरळ व्याज भरलेनंतर या नियमाच्या तरतूदीनुसार भाडेपट्टयाचे नुतनीकरण केली जाईल.

१५)महानगरपालिकेच्या मालमत्तेचा वापर त्याच उद्देशासाठी केला जाईल ज्यासाठी त्याचे वाटप केले गेले आहे.

१६)महानगरपालिकेच्या पूर्व परवानगीशिवाय भाडेपट्टाधारकाने केलेला वापरातील कोणतीही बदल कराराचा भंग मानला जाईल आणि महानगरपालिका भाडेपट्टा रद्द करण्याची प्रकिया सुरू करू शकेल.

१७)भाडेपट्टाधारक अतिरिक्त जागेचा वापर करणार नाही किंवा अतिरिक्त बांधकाम करणार नाही.अशा प्रकारचा वापर किंवा बांधकाम आढळून आल्यास,तो अटींचा भंग मानला जाईल आणि अधिनियम तरतुदीनुसार महानगरपालिकेकडून भाडेपट्टाधारकांस नोटीस देऊन उक्त मालमत्तेचा ताबा घेण्यासाठी योग्य कारवाई सुरू केली जाईल.

१८)जाहिर ई-निविदा ही सुरक्षा ठेव रक्कमेवर राहील.ज्याची सुरक्षा ठेव रक्कमेची ई-निविदा सर्वोत्तम दराची असेल त्यास दुकान गाळा भाडेपट्टयाने हस्तांतरित करण्यात येईल.त्याने नकार दिलेस भरलेली सर्व रक्कम महानगरपालिका जप्त् करेल.

१९)महानगरपालिकेस सदर दुकान गाळ्याची आवश्यकता भासल्यास भाडेपट्टयाची मुदत संपणेपूर्वी ३० (तीस) दिवस अगोदर दुकान गाळा हस्तांतरित करण्याची भाडेपट्टेधारकांस सुचना करील.गाळा रिकामा करून देणे गाळेधारकांवर बंधनकारक राहील.

२०)महानगरपालिका मालकीची मालमत्ता तारण किंवा गहाण ठेवली जाणार नाही किंवा त्रयस्थ पक्षाचे हितसंबंधीत प्रस्थापित किंवा करता येणार नाही. महानगरपालिकेच्या मान्यतेशिवाय भाडेपट्टयाचे परस्पर हस्तांतरण (सब लिज) केले जाणार नाही.गाळा सब लि. दयावयाचे झालेस सब लिजची रक्कम व हस्तांतरण शुल्क निश्चित करणेचे अधिकार मा.आयुक्त यांचे राहतील.अशा प्रकारची कोणतीह कसूर आढल्यास,महानगरपालिका आयुक्त अधिनियमातील तरतूदीनुसार किंवा निश्चित केलेल्या नियमांनुसार दंड आकारू शकतील.

२१)भाडेपट्टेधारकांस महानगरपालिका दुकान गाळा मुदतीपुर्व महानगरपालिकेच्या ताब्यात द्यावयाचा असल्यास ३० दिवस अगोदर महानगरपालिकेस लेखी कळविणे बंधनकारक / आवश्यक राहील.

२२)भाडेपट्टेधारकांस नुतनीकरण करण्यास इच्छुक नसल्यास ,महानगरपालिका अधिनियमातील तरतूदीनुसार संबंधीत भाडेपट्टाधारकांस नोटीस देऊन मालमत्तेचा ताबा घेण्याची कार्यवाही सुरू करेल.

२३) दुकान गाळ्यासाठी वीज जोडणीसाठी महानगरपालिकेकडून ना-हरकत दाखला देणेत येईल त्यासाठी येणारा संपूर्ण खर्च भाडेपट्टाधारकाने करणेचा आहे.

२४)दुकान गाळा भाडेपट्टेधारकांस आपला परिसर, इमारतीचा परिसर स्वच्छ ठेवणे बंधनकारक राहील. आपल्या शेजारील भाडेपट्टाधारकांस उपद्रव होईल असे वर्तन करता येणार नाही.

**२५) म.न.पा.स रस्ते/इमारत विकास वा अन्य कार्यालयीन कामासाठी भाडेपट्टयाने देणेत आलेल्या दुकानगाळाची आवश्यकता असल्यास तात्काळ ताबा देणे बंधनकारक राहील. याबाबत तक्रार / दावा करता येणार नाही.**

२६) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील तरतूदी व अटी,शर्ती,शासनाने स्थावर मालमत्ता हस्तांतरणांसंबंधी वेळोवेळी केलेल्या सुधारणा,कायदे,नियम,निर्देश आणि दरवाढ इ.लागू तारखेपासून भाडेपट्टेधारकावर बंधनकारक राहतील.

२७)किमान बोली रक्कमेपेक्षा कमी रक्कमेची बोली बोलता येणार नाही.

२८)अपवादात्मक परिस्थितीमध्ये लेखी कारणे नमूद करून मंजूर ई-निविदा नामंजूर करणेचा अधिकार मा.आयुक्त यांना राहील.

२९)गाळ्याच्या मोजमापा इतकीच जागा गाळेधारकांस वापरता येईल.शॉप अ‍ॅक्ट नियम गाळे धारकांस बंधनकारक राहतील.

३०) दुकान गाळ्यामध्ये तयार होणारा कचरा ओला व सुका वेगवेगळा करून महानगरपालिका घंटा गाडीत टाकावा.दुकान व दुकानगाळा परिसर स्वच्छ ठेवणेची जबाबदारी भाडेकरू म्हणून आपली राहील.

३१)दुकान गाळेचा वापर ड वर्ग महानगरपालिकेसाठी तयार करण्यात आलेल्या विकास नियंत्रण नियमावलीतील तरतुदीनुसार करावा लागेल.

३२)पात्र निविदाधारक यांनी मंजूर झालेल्या गाळेपोटी १० दिवसाच्या आत उर्वरित रक्कम महानगरपालिकेकडे भरणा करून भाडेपट्टा करार पूर्ण करणे आवश्यक आहे. मुदतीत रक्कम न भरणा केलेस व भाडेपट्टा करार न केलेस ई-निविदेमधील अटी शर्तीनुसार इकडे भरणा केलेली ई बयाणा / इसारा रक्कम जप्त केली जाईल.

३३)कोरी ई निविदा **http:mahatenders.gov.in** या संकेतस्थळावर दि.18 /5 /२०२६ रोजी स.11.00 वाजले पासून दि.25/5/२०२६ रोजी दु.3.00 वाजेपर्यंत ऑनलाईन पहावयास मिळतील.

३४)भरलेली ई निविदा सादर करण्याची अंतिम दि.25/5 /२०२६ दुपारी 3.00 वाजेपर्यंत राहील.

३५) शक्य झालेस ई निविदा दि.26/5 /२०२६ दुपारी 4.00 वाजता उपस्थित निविदाधारकांसमोर उघडणेत येईल.

३६) कोणतीही ई निविदा मंजूर अथवा सर्व ई निविदा नामंजूर करणेचे अधिकार महानगरपालिकेने राखुन ठेवलेले आहेत. त्याची कोणतीही कारणे दिली जाणार नाही.

३७) अधिक माहितीसाठी उपरोक्त संकेतस्थळावर व मालमत्ता व्यवस्थापन (मिळकत) विभागाकडे संपर्क साधावा.

३८) ई निविदा प्रक्रियेबाबत तसेच वरील नमूद अटी शर्तीसंबंधात भविष्यात कोणतीही वाद उद्‌भवल्यास त्याबाबत मा.आयुक्त यांचा निर्णय अंतिम राहील.

11/05/26 11.05.2026

| (श्रीकांत पाटील) | (श्रीम.आरती पाटील-खोत) | (विकास खोळपे) | (नंदू परळकर) | (सुषमा शिंदे कोल्हे) |
|---|---|---|---|---|
| प्र. सहा. आयुक्त | मुख्य लेखापरिक्षक | मुख्य लेखा व वित्त अधिकारी | आयुक्त (१) | उपायुक्त आयुक्त |

इचलकरंजी महानगरपालिका, इचलकरंजी

Signature Not Verified
Digitally signed by Shrikant Shivgonda Patil
Date: 2026.05.14 16:00:37 IST
Location: Maharashtra-MH